# संचालनालय लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण समिती
# (DATSWA) महाराष्ट्र राज्य,मुंबई.

(नोंदणी क्रमांक : एमएएच-१६४३/२००४/जीबीबीएसडी,दिनांक १६/०९/२००४)
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्र.एफ-२७९३३,मुंबई दिनांक ०८/०८/२००५.
नवीन शासकीय कुटीर क्र.१५ व १६,प्लॉट क्र.१७६,फ्री प्रेस जर्नल मार्ग,मुंबई-४०० ०२१.

लेखा व कोषागारे संचालनालय व स्थानिक निधी लेखा विभागाच्या नियंत्रणाखाली सुमारे सात हजार अधिकारी / कर्मचारी महाराष्ट्राच्या राजधानीपासून तालुका स्तरापर्यंत काम करीत आहेत. कोषागार कार्यालये / उपकोषागार कार्यालये, स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालये, जिल्हा परिषदा, शासनाच्या विविध विभागांची राज्य, विभाग व जिल्हा पातळीवरील कार्यालये, अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई अशा विविध कार्यालयामध्ये या विभागाचे अधिकारी व कर्मचारी काम करतात. शासनाची मंडळे / महामंडळे, कृषि विद्यापीठे, महापालिका अशा कार्यालयांमध्ये देखील या विभागाचे अधिकारी व कर्मचारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत असतात. या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर क्रीडास्पर्धा आयोजित करण्यात येतात आणि त्या निमित्त एक स्मरणिका प्रकाशित करण्यात येते. ही स्मरणिका राज्याच्या सर्व भागात जाते. क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, वैद्यकीय मदत इ. कर्मचारी कल्याणार्थ उपक्रमांच्या आयोजनासाठी ही कल्याण समिती स्थापन करण्यात येऊन ती धर्मदाय आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचेकडे नोंदणीकृत केलेली आहे.

संचालनालय लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण निधी तयार करण्याकरीता, कल्याणकारी योजना राबविण्याकरीता आणि त्या अनुषंगाने आवश्यक असणारी कामे पार पाडण्याकरीता नियमावली / संहिता तयार करण्यात आली आहे. तसेच योजना राबविण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांचेकडून वार्षिक वर्गणी, देणगी कल्याण निधीत जमा करण्यात येते. या समितीवर अधिकारी व कर्मचारी यांचेमधून कार्यकारीणीची निवड करण्यात येते. सदर समितीचा कार्यकाळ ३ वर्षाचा असतो. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य,मुंबई हे या समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतात. या समितीच्या सभासदांचे / वर्गणीदारांचे अपघाती निधन झाल्यास त्यांच्या कुटूंबियांना तातडीची आर्थिक मदत देण्यासाठी म्हणून न्यू इंडिया अॅश्युरन्स कंपनी कडे सामुहिक अपघात विमा योजनेअंतर्गत पॉलीसी काढण्यात येते. प्रतिलाभार्थी रुपये १ लाख इतकी मदत विमा कंपनीकडून प्राप्त करुन मृत सभासदाच्या कुटूंबास वितरीत करण्यात येते.

# RULES & REGULATION
# OF
# Directorate of Accounts & Treasuries Staff Welfare Association (DATSWA)

1) **DEFINITION :-**
The word "Society" wherever mentioned means **Directorate of Accounts & Treasuries Staff Welfare Association (DATSWA).**

2) **JURISDICTION :-**
The jurisdiction of the Society shall only be in Maharashtra State.

3) **FINANCIAL YEAR :-**
The Financial year of the Society shall be 1st April to 31st March of every year.

4) **MEMBERSHIP :-**

The Membership of the Society is open to all officers of Maharashtra Finance & Accounts Service and employees under the control of the Directorate of Accounts & Treasuries and who agree with the aims and objects of the Society. They shall have to abide by the Rules and Regulations of the said Society. Membership will be allowed after consideration and approval of Managing Committee. Managing Committee keeps the right to reject any Application for membership without giving any specific reason.

5) **TYPES OF MEMBERS :-**

Ordinary Member :- A person who pays Rs.25/- per year may be admitted as Ordinary Member.

Life Member :- A person who pays Rs.500/- at a time may be admitted as a life member.

6) **CEASING TO BE A MEMBER :-**

A person shall ipso-facto cease to be a member and shall be removed as such by the Managing Committee.

(a) On his / her death or retirement or resignation or removal from service.

(b) On his / her resignation of Membership

(c) On his / her convicted of criminal offence.

(d) If he / she fails to pay his / her subscription for more than two years.

(e) If he / she breaks the Rules and Regulations of the Society.

(f) If he / she is of unsound mind.

## 7) MANAGING COMMITTEE :-

The Management and adminsitration of the said Society shall be carried out on and managed by the Managing Committee which may pay all legal expenses incurred in promoting and registration of the said society, are mentioned herein these Rules and Regualations and specifically required to be exercised by the Committee in General Body Meeting.

The Managing Committee shall be constituted of the following members :-

| | | |
|---|---|---|
| President | - | 01 |
| Vice President | - | 01 |
| Secretary | - | 01 |
| Joint Secretary | - | 01 |
| Treasurer | - | 01 |
| Assistant Treasurer | - | 01 |
| Members | - | 09 |

There shall be Maximum Fifteen and Minimum Seven Members in the Managing Committee.

The Director of Accounts & Treasuries will be the ex-officio President of the Association. The Managing committee may choose an Executive President for smooth working of the Association if required.

The Managing Committee so constituted as aforsaid shall elect from amongst themselves the other Office-bearers.

Any retiring member of the Managing Committee shall be eligible for re-election. The casual vacancies however, may be filled up by the Managing Committee. Any person elected by the Managing Committee shall hold office for the remaining period only.

## 8) POWER OF THE MANAGING COMMITTEE :-

The Managing Committee shall work and have full powers and authority to do all acts, matter, things and deeds which may be necessary or expedient for the purpose of and in particular to the following :-

A) To look after, manage, supervise and control the management of the said society and its properties.

B) To admit or reject new member and accept resignation of the members.

C) To have an audited statement of accounts prepared every year for submission to the Registrar of Societies and any other authority as may be required as the Law for the time being in force, if any.

D) To accept donation in cash or in kind on such condition and without condition.

E) To make an appeal to the people for general donation as per the decision of the General Body.

F) To appoint such committee with such powers as the Managing Committee may think fit and proper, for such purpose. And/or to disband the same when the purpose is over.

G) Generally, to do all such other acts, things as are incidental or conducive to the attainment of the above powers and duties or anyone or more of them and the aims and objects specified in the Memorandum of Association.

H) The Managing Committee will have the powers to decide the set up of Regional Committee at Regional level & District Committee at District Level and to delegate Financial Power to such authorities like opening and operating of Bank Accounts, to receive and spend money on behalf of the Association, etc.

**9) MEETING OF THE MANAGING COMMITTEE :-**

Members of the Managing Committee shall meet ordinarily once in three months or more if necessary to conduct the affairs of the said society. Minimum seven days notice of the meeting in writing / by hand delivery should by given to the members of the Managing Committee.

**10) REQUISITION MEETING OF THE MANAGING COMMITTEE :-**

The meeting of the Mananging Committee may be convened upon a requisition made in wirting by President and / or any $3/5^{th}$ members of the Managing Committee. Such requisition shall specify the subject of the meeting proposed to be called and must be signed by all the requisitionists and shall be delivered at the office of the Society. On receipt of the requisition the Managing Committee shall forthwith proceed to convene the meeting. If , Managing Committee fails to do so, then the

President and / or the requistionists themselves may convene such meeting within 10 days from the delivery of such requisition. Quorum for the requisition meeting shall be 2/3rd members present in the meeting of the Managing Committee.

11) **QUORUM FOR THE MANAGING COMMITTEE :-**

2/3rd members present in the meeting shall. form a quorum of the Managing Committee. If meeting is adjourned for want of quorum shall be held half an hour later at the same place and members present shall form the quorum. But, in no event any business that is not specified in the Notice be transacted in such meeting.

12) **MINUTES TO BE KEPT :-**

The Managing Committee shall have to maintain minute book which shall appear :
A clear report of the proceeding of such meeting.
A copy of each notice convening the meeting of Managing Committee and General Body and of each circular in which the decision has been arrived at by the Managing Committee. Minutes shall be read over the next meeting of the Managing Committee and when confirmed shall be signed by the President of such meeting.

13) **OFFICE BEARERS AND THEIR DUTIES :-**

a) **(i) PRESIDENT :-** The President of the Society, shall preside over the meeting and regulate all the meeting of the Managing Committee. The President shall in addition to his rights of voting as a member have a casting vote in case of tie.

a) **(ii) EXECUTIVE PRESIDENT :-** The Executive President shall carry out all the functions entrusted to him by the President.

b) **VICE PRESIDENT :-** The Vice Presidnet shall asist the President in his day to day activities and shall perform his duties in his absence.

c) **SECRETARY :-** The Secretary shall accept application for membership and submit to the Mananging Committee and he will maintain Membership Register up-to-date. He shall maintain minute book and attend daily routine correspondence. The Secretary shall maintain all other necessary books.

d) **JOINT SECRETARY :-** The Joint Secretary shall assist the Secretary in his work and perform his duties in his absence.

e) **TREASURER :-** The Treasurer shall ordinarily receive all payments made to the Society and pass the necessary receipts and shall maintain account books.

f) **ASSISTANT TREASURER :-** The Assistant Treasurer shall assist the Treasurer in his work and perform his duties in his absence.

g) **MANAGING COMMITTEE MEMBER :-** He shall attend all the Managing Committee Meeting and shall actively participate in deliberation as agenda. He shall assist, advice, suggest, guide and co-operate with other members of the Committee for porper discharge of their duties jointly and severally. He shall be bound to offer any service to the betterment and upliftment of the Association.

**14) GENERAL BODY MEETING :-**

The General Body Meeting of the Society shall be held once in a year within 90 days immediately after 31st March of every year at such place time and date as Managing Committee shall determine.

**15) EXTRA ORDINARY GENERAL BODY MEETING :-**

An Extra Ordinary General Body Meeting may be convened by the Managing Committee of its own motion, or upon a requisition made in writing by President and / or any 3/5th members of the Society. Such requisition shall specify the subject of the meeting proposed to be called and must be signed by all the requisitionists and shall be delivered at the office of the Society.

**16) NOTICE OF THE GENERAL BODY/EXTRA GENERAL BODY MEETING :-**

Fifteen clear days notice specifying the place, date, time with agenda shall be given to the each and every member of the Society, by hand delivery to their registered

address or by Registered Post A.D. But the accidental omission to give or not / receipt of such a notice by any member shall be invalid at the proceeding of any General Body Meeting.

**17) BUSINESS OF THE ANNUAL GENERAL BODY MEETING :-**

The business of the Annual General Body Meeting shall be :-

a) To confirm the minute of the previous Annual General Body Meeting
b) To adopt the previous years and audited statement of documents.
c) To elect the Managing Committee for the next terms, if the term is over.
d) To admit new members as per decision taken by the Managing Committee.
e) To appoint Advocate / Legal Adviser, Chartered Accountant and fix their remuneration's.
f) To consider any other matter, due notice of which has been given five days prior to the General Body Meeting.

**18) QUORUM OF THE GENERAL BODY MEETING :-**

The Quorum for the General Body Meeting shall be 2/3rd of the members of the Society on record. Any adjourned meeting for want of quorum shall be held half an hour later at the same place and the members present shall form the quorum. But no business other than that specified in the notice shall be transacted at such meeting.

**19) ELECTION :-**

The Election shall take place after every three years in the General Body Meeting by Secret Ballot Paper.

**20) SOURCE OF INCOME :-**

Society shall raise their funds by way of subscription, contribution, membership fees, grants, bank interests, donation in cash or in kind or by any other legal means.

**21) BANK ACCOUNT :-**

The Managing Committee shall open Bank Accounts / Accounts in any Scheduled Bank / Nationalised Bank in the name of the Society and shall be operated by jointly atleast two office bearer out of President, Secretary and Treasurer.

**22) SUB COMMITTEE / COMMITTEES :-**

The Managing Committee shall have power to appoint sub committee or committees as and when necessary and which the President of the Society shall preside over these sub committee or committees.

**23) BOOKS OF ACCOUNTS :-**

The Managing Committee shall direct the Treasurer to keep the accounts, up-to-date, and / or the help of the auditor specifically appointed for the purpose. And shall be audited by qualified Chartered Accountant regularly.

**24) EXPENSES ON THE OBJECT :-**

The fund of the Society should be used for the full-fillment of the objects of the Society as specified in the Memorandum of Association.

**25) PROVISION REGARDING SALE AND PURCHASE OF IMMOVABLE PROPERTY :-**

Society can sale its property in the name of the Society as decided by General Body Meeting with prior permission of the Charity Commissioner.

**26) PROVISION REGARDING LOANS AND DEPOSIT :-**

Managing Committee shall have power to keep Society Deposit in a Scheduled Bank or Nationalised Bank and also it shall have power to raise interest free loan from any Individual Body or Institution for the requirment of the Society by taking permission of the Charity Commissioner.

27) **MEMBEKSHIP REGISTER TO BE KEPT :-**

A Membership up-to-date reigter of members who are members within the meaning of Section 15 of the Societies Registration Act, 1860 will be maintained in the form of Schedule VI to the Societies Registration (Maharashtra) Rules , 1971 vide Rule 15 thereof. This Membership Register shall be produced at the time of General Body Meeting for the verification of the General Body.

28) **CUSTODY OF THE DOCUMENTS :-**

Any important papers connected to the Society shall be kept at the registered office and / or any other suitable place as per the decision of the Society.

29) **PROVISION FOR AMENDMENTS IN RULES AND REGULATION :-**

This change shall be take place by 3/5$^{th}$ majority of General Body Meeting.

30) **PROVISION FOR CHANGE IN NAME AND OBJECTS OF THE SOCIETY :-**

This change shall be take place according to Sectiuon of 12 and 12-A of the Societies Registration Act, 1860.

31) **DISSOLUTION :-**

The Society can be dissolved in accordance with Section 13 and 14 of the Societies Registration Act, 1860.

## CERTIFICATE

Certified to be true copy of the Rules and Regulation of the Society viz. Directorate of Accounts & Treasuries Staff Welfare Association, Mumbai 400021 (DATSWA).

**( PRESIDNET )** **( SECRETARY )** **( TREASURER )**

PLACE :- MUMBAI
DATE :-

विशेष–ध. आ./मुं. सा. वि./५० म.

क्रमांक

73

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

1643

महाराष्ट्र राज्य, मुंबई

नोंदणी क्रमांक ~~-११-~~ बी. बी. बी. एस. डी. 2004

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, डायरेक्टरेट ऑफ अकाऊंट्स ॲण्ड ट्रेजरीज स्टाफ वेल्फेअर असोसिएशन (डी.ओ.टी.एस.डब्लू.ओ)

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

तारीख १९ सप्टेंबर २००४ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

16/9/2004

संस्थांचे सहायक निबंधक,

.....विभाग.

सहायक संस्था निबंधक
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

ASSISTANT REGISTRAR OF SOCIETIES
GREATER BOMBAY

TRUE COPY

ACCOUNTS OFFICER (O. & M. O.)
DIRECTORATE OF ACCOUNTS &
TREASURIES, MUMBAI

विशेष/ध.आ./मु.सा.वि./२७.

45

सत्यमेव जयते

## नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये बृहन्मुंबई विभाग, मुंबई..... येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव डायरेक्टोरेट ऑफ अकाउंट्स अँड ट्रेजरीज स्टाफ वेलफेअर असोसिएशन (डी.ए.टी. पस डब्ल्यू.ओ)

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक मुंब-२०८३३ (मु)

डी. पस. जे. अदरी ..... यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 4/8/2004 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

CHARITY COMMISSIONER GREATER BOMBAY REGION MAHARASHTRA STATE

शेवका

सही .....

सहायक धर्मादाय आयुक्त

पदनाम बृहन्मुंबई विभाग, मुंबई

TRUE COPY

ACCOUNTS OFFICER (O. & M. O.)
DIRECTORATE OF ACCOUNTS &
TREASURIES, MUMBAI

संचालनालय, लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण समिती
(DATSWA) महाराष्ट्र राज्य, मुंबई
(नोंदणी क्रमांक : एमएएच-१६४३/२००४/जीबीबीएसडी, दिनांक १६/०९/२००४)
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्र.एफ-२७९३३, मुंबई, दि.०८/०८/२००५.
नवीन शासकीय कुटीर क्र.१५ व १६, प्लॉट क्र.१७६, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०० ०२१.

क्रमांक : डॅटस्वा-२०१०-२०११/ दिनांक : 23/१२/२०१०

प्रति,

१) मुख्य लेखा परीक्षक ,
स्थानिक निधी लेखा विभाग, महाराष्ट्र राज्य,
कोकण भवन, नवी मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी,
वांद्रे-पुर्व, मुंबई.
३) सह / उपसंचालक,
लेखा व कोषागारे,
कोकण विभाग, नवी मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
४) वित्तीय सल्लागार आणि उप सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मरीन लाईन्स, मुंबई.
५) सह / उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ),
स्थानिक निधी लेखा ,
कोकण विभाग, नवी मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व)
७) कोषागार अधिकारी (सर्व)
८) उपमुख्य लेखा परीक्षक (सर्व)
९) अध्यक्ष / सचिव,

---

---

विषय : संचालनालय, लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण समितीच्या (DATSWA)
दिनांक २७/११/२०१० रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

महोदय / महोदया,

संचालनालय, लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण समितीतर्फे संचालनालय, लेखा व कोषागारे आणि मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा विभागाच्या नियंत्रणाखालील अधिकारी /कर्मचारी तसेच अन्य विभागात / कार्यालयात कार्यरत असलेले महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या दिनांक २७/११/२०१० रोजी घेण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सोबत जोडण्यात आले आहे. सदर इतिवृत्त सर्व सदस्यांच्या कृपया निदर्शनास आणावे.

आपला,

(गुलाब पवार)
सचिव,
संचालनालय, लेखा व कोषागारे कर्मचारी
कल्याण समिती (DATSWA) मुंबई.

सोबत : इतिवृत्ताची प्रत.

संचालनालय लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण समिती
(DATSWA) महाराष्ट्र राज्य, मुंबई
(नोंदणी क्रमांक एमएच-१६४३/२००४/जीबीबीएसडी, दिनांक १६/०९/२००४)
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थापनाच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक:एफ-२७९३३/मुंबई, दिनांक ०८/०८/२००५
नवीन शासकीय कुटीर क्रमांक १५ व १६, प्लॉट क्रमांक १७६, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

दिनांक :- 13 DEC 2010

# -: इतिवृत्त :-

## दिनांक २७ नोव्हेंबर,२०१० रोजी मुंबई येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

संचालनालय लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण समिती (DATSWA) महाराष्ट्र राज्य,मुंबई यांची वार्षिक सर्वसाधारण सभा शासकीय कुटीर क्रमांक १९,नरीमन पॉईन्ट मुंबई येथे दिनांक २७ नोव्हेंबर,२०१० रोजी दुपारी २.३० वाजता भरवण्यात आली होती. समितीचे पदसिध्द अध्यक्ष संचालक,लेखा व कोषागारे श्री.शिलानाथ जाधव यांचे अध्यक्षतेखाली व श्री.रवींद्र धोंगडे , मावळते अध्यक्ष यांचे उपस्थितीत सदर सभा पार पडली. सभेस उपस्थित राहिलेल्या पदाधिकारी आणि सदस्य यांची यादी सोबत जोडलेली आहे.

अधिदान व लेखा कार्यालयाच्या कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस श्री.गुलाब पवार यांनी बैठकीच्या सुरुवातीस पदाधिकारी व सदस्य यांचे गुलाब पुष्प देवून स्वागत केले. संचालनालय लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण समितीच्या घटनेनुसार कार्यरत संचालक, लेखा व कोषागारे,महाराष्ट्र राज्य,मुंबई हे सदर समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतील अशी तरतुद आहे. या तरतुदीनुसार विद्यमान संचालक लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य,मुंबई श्री.शिलानाथ जाधव यांनी दिनांक ११ ऑगस्ट,२०१० (म.नं.) पासून समितीच्या अध्यक्ष पदाची सुत्रे ग्रहण केली आहेत.

श्री.सु.गो.व्यास, उपसंचालक, लेखा व कोषागारे,मुंबई यांनी श्री.शिलानाथ जाधव यांच्या अभिनंदनाचा ठराव सभेत मांडला या ठरावास श्री.गुलाब पवार यांनी सर्वानुमते अनुमोदन दिले. या नंतर मावळते अध्यक्ष श्री.रवींद्र धोंगडे यांनी वार्षिक सर्वसाधारण सूचनापत्रका मध्ये नमुद विषयसूची नुसार सभेच्या कामकाजास प्रारंभ केला. सभेत खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

१) मावळते अध्यक्ष श्री.रवींद्र धोंगडे यांनी लेखा कोष भवन,पुणे येथे दि.२२/११/२००९ रोजी झालेल्या मागिल वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले. सदर इतिवृत्तास उपस्थितांनी एकमताने मान्यता दिली.

२) सन २००६ -२००७ व सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले जमा-खर्चाचे [illegible] सभेपुढे ठेवण्यात आले. सदर आर्थिक वर्षातील जमा-खर्चाच्या बाबींचे वाचन झाल्यानंतर सदर लेखे सर्वसा[illegible] सभेने स्विकृत करुन मंजुरी दिली.

३) आर्थिक वर्ष २००८-२००९ व २००९-२०१० या वर्षाच्या जमा-खर्चाचा आढावा सभेत घेणेत आला. सन २००८-२००[illegible] व सन २००९-२०१० चे प्रमाणित लेखे पुणे, अमरावती, नागपूर या विभागीय समित्या वगळता इतर विभा[illegible] समित्यांनी अदयापही सादर केलेले नव्हते. विभागीय समित्यांनी त्यांचेकडील प्रमाणित लेखे सादर केलेले नसल्यामु[illegible] केंद्रीय समितीचे एकत्रित लेखे तयार करण्याचे काम खोळंबले असल्याची बाब सभेपुढे ठेवण्यात आली. समितीचे

आर्थिक लेखे अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे व हिशेबाच्या कामातील उदासिनता पाहून सचिव श्री.सु.प्र.कानडे यांनी नाराजी व्यक्त केली. लेखा व लेखा परीक्षा विषयक काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांचे कडून ही बाब अपेक्षित नाही असेही ते म्हणाले. राज्यस्तरीय स्पर्धांकडे केवळ क्रीडा स्पर्धा म्हणून पाहणे योग्य नाही. तर अशाच स्पर्धांमधून आपण नेतृत्व गुण, घटना व्यवस्थापन शिकत असतो. पथ्य,शिस्त पाळून व औचित्याचे भान ठेवून ही समिती निर्माण करण्यामागचा हेतू सफल करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सभेत प्रबोधन केले.

श्री.सुनिल व्यास,उपसंचालक यांनी यावर मार्ग काढण्यासाठी टॅलीसारख्या सॉफ्टेवेअरचा वापर करावा, जेणेकरुन लेखे बिनचूक व वेळेत तयार होतील असे सूचविले. मावळते अध्यक्ष श्री.रवींद्र धोंगडे यांनी समितीची आर्थिक बाजू, वित्तीय शिस्त, चोख हिशोब व लेखे वेळेवर सादर करणे इत्यादी आवश्यक बाबींचे प्रतिपादन करुन प्रलंबित हिशोबाचे काम प्राधान्याने हाती घेवून परिपूर्ण प्रमाणित लेखे केंद्रीय समितीला पाठवावे, अशी सूचना केली. अशा प्रकारे प्रलंबित हिशोबावर सविस्तर चर्चा होवून प्रलंबित हिशोब त्वरित पूर्ण करुन केंद्रीय समितीकडे तात्काळ पाठविण्याचे सर्वानुमते ठरले.

४) केंद्रीय समितीच्या (मुख्यालयी) बँकेच्या खात्यावर गुंतवणूकीसह रुपये १७,४३,६८७/- (अक्षरी रक्कम रुपये सतरा लाख त्रेचाळीस हजार सहाशे सत्याऐंशी फक्त) इतकी रक्कम शिल्लक असल्याची माहिती सभेत देण्यात आली. खाली नमुद करण्यात आलेल्या गुंतवणूकीचा तपशील वाचून दाखविण्यात आला.

| अ.क्र. | रकमेचा तपशील | गुंतवणूकीचा कालावधी | परिणत दिनांक |
|---|---|---|---|
| १. | रक्कम रुपये ४ लाख | १३ महिने | २३.०५.२०११ |
| २. | रक्कम रुपये ४ लाख | ५०० दिवस | ७.१०.२०११ |
| ३. | रक्कम रुपये १.५ लाख | सहा महिने एक दिवस | ०७.०३.२०११ |
| ४. | रक्कम रुपये १.५ लाख | ९१ दिवस | ०६.१२.२०१० |
| ५. | रक्कम रुपये २ लाख | सहा महिने १ दिवस | ०७.०३.२०११ |
| एकूण गुंतवणूक रुपये १३,००,०००.०० | | | |
| बचत खात्यातील शिल्लक ४,४३,६८७.०० | | | |
| एकूण शिल्लक ( गुंतवणूकीसह ) १७,४३,६८७.०० | | | |

मागील सभेपासून या सभेपर्यंत करण्यात आलेल्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली. तसेच या वर्षात घ्यावयाच्या क्रीडा स्पर्धा व नवीन कार्यक्रम डोळया समोर ठेवून खर्चाकरीता निधीची उपलब्धता विचारात घेवून आवश्यकतेप्रमाणे निधीची गुंतवणूक अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यांनी करावी असा ठराव मंजूर करण्यात आला.

५) मावळते अध्यक्ष श्री.धोंगडे यांनी अपघात विमा योजने अंतर्गत देण्यात येणा-या सर्व लाभाविषयी सभागृहास माहिती दिली. ती पुढील प्रमाणे :-

१) कै.श्री.धर्माजी कोंडावार,औरंगाबाद — रु. १ लाख दि.१३/०४/२०१०
(श्रीमती मनिषा ध.कोंडावार)

२) कै.श्री.ओमप्रकाश गहूकर — रु. १ लाख दि.१३/०४/२०१०
(श्रीमती सुलभा ओ.गहूकर)

---

एकूण रु. २ लाख

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात न्यु इंडिया अश्युरन्स,मुंबई या विमा कंपनीकडे रुपये ३,०७,१८६/- (अक्षरी तीन लाख सात हजार एकशे शहाऐंशी) चा विमा हप्ता भरण्यात आला. सभागृहाने विमाकंपनीकडे भरलेल्या सदर हप्त्यास एकमताने मान्यता दिली. तसेच यापुढेही अपघात विमा चालू ठेवावा असे एकमताने ठरले.

६) सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना या विमायोजनेचा लाभ मिळावा या करीता सर्व सभासदांनी प्रत्येकी वार्षिक रुपये २००/- वर्गणी भरणे आवश्यक असल्याचे व त्याप्रमाणे वर्गणी भरण्याचे आवाहन मावळत्या अध्यक्षांनी केले. सभासद वर्गणीचे लेखे कर्मचारीनिहाय ठेवणे आवश्यक आहे. जरी कर्मचा-यांच्या समुहासाठी एकच पावती दिलेली असली तरी सदर पावतीची छायाप्रत नोंदवहीला चिकटवून त्या पावतीचा क्रमांक व दिनांक त्या त्या कर्मचाऱ्यांच्या सदस्य नोंदीसमोर नमुद करावा. वर्गणीदार सदस्यांना सदस्य क्रमांक देण्यासाठी सेवार्थ मधील माहितीचा वापर करता येवू शकेल असे सभेत सुचविण्यात आले. सदर क्रमांक देवून जे अधिकारी /कर्मचारी वर्गणी देतील त्यांनाच अपघात विम्याचा फायदा अनुज्ञेय करण्याचे सभेत ठरले. तसेच उपरोक्त कार्यवाही करण्यास काही कालावधी लागणार असल्यामुळे यावर्षी देखील पूर्वी प्रमाणे सर्व कर्मचाऱ्यांसाठी न्यु इंडिया अश्युरन्स कंपनीकडे विमा हप्ता भरण्याचे सर्वानुमते ठरले.

७) पुढील तीन वर्षाच्या कालावधीसाठी ( सन २०१०- ११ ते २०१२-१३ पर्यन्त) कार्यकारिणीची निवड करण्यांत आली.

अध्यक्ष : संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे पदसिध्द अध्यक्ष.
उपाध्यक्ष : मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालय,महाराष्ट्र राज्य,नवी मुंबई.
सचिव : श्री. गुलाब पवार, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
सहसचिव : सहसचिव पदावर आठ विभागांचा प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण आठ सहसचिव राहतील असा निर्णय घेण्यांत आला.

१) श्री. स्मिता पाटील, मुबई विभाग,
२) श्री. संभाजी मुळीक, अधिदान व लेखा विभाग.
३) श्री. नाना मोंडकर, कोकण विभाग.
४) श्री. सं. चं. शहा, पुणे विभाग.
५) श्री. एल. जी. नेवाडकर, नाशिक विभाग.
६) श्री. बालाजी परदेशी, कोषागार कार्यालय, बीड. औरंगाबाद विभाग.
७) श्री. जितेंद्र इंगळे,अमरावती विभाग .
८) श्री. बळी, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा नागपूर,नागपूर विभाग.

कोषाध्यक्ष : श्री. प्रकाश काळे, संचालनालय,लेखा व कोषागारे,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहकोषाध्यक्ष : श्री. भिकाजी जोईल, सहायक लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

कार्यकारणी सभासद

१) श्री. प्रशांत जोशी, कोषागार कर्मचारी संघटना.
२) श्री. वैभव काळखैर,अधिदान व लेखा कार्यालय कर्मचारी संघटना, मुंबई.

३) श्री. प्रकाश वानखेडे, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ संघटना.
४) श्री. विनोद हिंगणकर, अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य स्थानिक निधी लेखा कर्मचारी संघटना.
५) श्री. अजय पवार, सहा.अ. व ले. अ., म.वि.ले. सेवा राजपत्रित अधिकारी संघटना
६) श्री. बजरंग घोरपडे, कोषागार चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना.
७) श्री. विनोद सांगळे, संचालनालय लेखा व कोषागारे कर्मचारी संघटना.

## महिला प्रतिनिधी

१) श्रीमती अरुणा झगडे, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई.
२) श्रीमती संध्या पवार, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण म.मुक्त विद्यापीठ,नाशिक.
३) श्रीमती रत्नमाला पाटील, लेखा अधिकारी,संचालनालय,ले. व को. मुंबई.
४) श्रीमती राजेश्वरी देशपांडे, लेखा अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
५) श्रीमती राजश्री ठोकळ,सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) श्रीमती सुवर्णा पांडे, सहाय्यक संचालक(लेखा),आयुक्त कार्यालय,नागपूर.
७) श्रीमती वंदना आवटे,कोषागार कार्यालय,पुणे.
८) श्रीमती कुसुम राठोड, लेखा अधिकारी, अकोला.

नवीन पदाधिका-यांच्या ( अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष ) नमुना स्वाक्षरी IDBI बॅकेकडे पाठविण्यात याव्यात असा निर्णय झाला.

८) सन२०१०-११ च्या राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्याच्या अनुषंगाने विद्यमान अध्यक्ष श्री. शिलानाथ जाधव यानी असे मत व्यक्त केले की, राज्यस्तरीय स्पर्धामध्ये होणारा खर्च पाहाता त्यामध्ये उत्सवप्रियता दिसून येते हे स्वरुप कमी करणे आवश्यक आहे. तसेच राज्यस्तरीय स्पर्धाचे आयोजन अधिक न लांबविता दोन दिवसामध्ये उद्घाटन सोहळा ते कार्यक्रमांची सांगता पूर्ण होणे आवश्यक आहे. लेखा व कोषागारे विभाग व स्थानिक नि. ले. विभाग यांनी एक दिलाने एकत्रित काम करणे आवश्यक आहे. तसेच क्रीडा स्पर्धाशी संबधित सभा आयोजित करतांना स्थानिक, विभागीय तसेच राज्यस्तरीय संघटनांच्या प्रतिनिधींना त्या संबंधी सूचना देवून सहभागी करुन निर्णय घ्यावेत. यासाठी जिल्हा/विभाग व राज्यस्तरीय स्पर्धाचे आयोजन करताना दोन्ही विभागांनी समन्वय साधून एकत्र येणे गरजेचे आहे. यास आमसभेमध्ये आवाजी मताने संमती मिळाली विद्यमान अध्यक्ष या नात्याने त्यानी सन २०१०-११ च्या राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा नाशिक विभागाने घेण्यास सहमती दिली. सहसंचालक लेखा व कोषागारे, नाशिक विभाग यांनी त्यांच्या विभागातील म. वि. ले. सेवेतील अधिकारी, संबंधित कर्मचारी संघटना यांच्या समन्वयाने स्पर्धाच्या आयोजनाच्या तारखा निश्चित कराव्यात असे ठरले.

राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी खालीलप्रमाणे समित्या स्थापन करण्याचा निर्णय एकमताने घण्यात आला

| अ.क्र. | समितीचे नांव | समिती प्रमुखाचे नांव | समिती सदस्यांची नांवे |
|---|---|---|---|
| १ | आयोजन समन्वय व तक्रार निवारण समिती | श्री. शिलानाथ जाधव अध्यक्ष संचालनालय लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण समिती, मुंबई तथा संचालक व लेखा कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई | १) श्री.रवींद्र धोंगडे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,महाराष्ट्र राज्य,मार्गपरिवहन महामंडळ,मुंबई.<br>२) श्री.दि. श्री. जोखे, पुणे संचालक संवर्ग<br>३) श्री. सी. जी. पवार, संचालक<br>४) श्री. वा. पु. शिलारकर, संचालक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ५) श्री. सु. प्र. कानडे, संचालक, वित्त विभाग.<br>६) श्री. स. सा. अली कादरी, सहसंचालक<br>७) श्री.अनिल वाघवसे,अधिदान लेखा अधिकारी,मुंबई.<br>८) श्री.बाळासाहेब घोरपडे,सहसंचालक,ले.व.को.औ.बाद<br>९) श्री.एस.एस.तडकसे, सहसंचालक,ले.व.को.पुणे.<br>१०) श्री.विनायक साठे, सहसंचालक,ले.व.को,मुंबई.<br>११) श्री.एस.के.देशमुख,मुख्य लेखा व वित्त अधिकारी,<br>१२) श्री.राजेश लांडे,सहाय्यक संचालक,अमरावती.<br>१३) श्री.गणेश पुरभे,स्वीय सहायक,ले.व.को.मुंबई.<br>१४) श्री.सभांजी मुळीक,अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई.<br>१५) श्री.ग. प्र. कुलकर्णी,अध्यक्ष,म.वि.ले.से.वर्ग-३ संघटना<br>१६) श्री.गुलाब पवार,अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई.<br>१७) श्री.रमेश गिरी,नागपूर<br>१८) श्री.जब्बार शेख<br>१९) श्री.भास्कर बोदवडे<br>२०) श्री.प्रकाश गुणदेकर,लेखा अधिकारी<br>२१) श्री.मदन गाडगे<br>२२) श्रीकांत भेंडे<br>२३) श्रीमती स्मिता पाटील<br>२४) श्री.बंजरग घोरपडे |
| २ | निधी व हिशेब समिती | श्री.प्रकाश काळे (लेखा अधिकारी) संचालनालय,लेखा व कोषागारे, मुंबई. | १) श्री.मोरेश्वर बागडे<br>२) श्री.किशोर पुंडकर<br>३) श्री.दिगंबर शिवलकर<br>४) श्री.प्रविण पेडणेकर<br>५) श्री.नाना मोडकर<br>६) श्री.सुनिल मोरे<br>७) श्री.पदमाकर वानरे<br>८) श्री.संजय तांबे<br>९) श्री.विजय शार्दूल<br>१०) श्री.विलास राणे<br>११) श्री.आकरे , नागपूर |
| ३ | स्वागत/ समारोप समारंभ व पारितोषिक समिती | श्री. पी.एम.गवळी, सहसंचालक, नाशिक. | १) श्री. महेश बच्छाव,सहा.संचालक, नाशिक<br>२) श्री. नागरगोजे<br>३) श्री. गोविंद पाटील<br>४) श्री. शेळके<br>५) श्री. इम्रान खान<br>६) श्री. सूर्यकांत सोनावणे<br>७) श्री. विलास परब<br>८) श्री. महेश भांगरे<br>९) श्री. रमेश जगताप<br>१०) श्री. घनश्याम गवई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ११) श्री.पी.एल.संदानशिव<br>१२) श्री.नंदकुमार तिर्लोटकर<br>१३) श्री.दिनेश ठाकूर |
| ४ | प्रसिध्दी माहिती व स्मरणिका समिती | श्री. सु. प्र. कानडे<br>संचालक संवर्ग | १. श्री. दिलीप पाटील<br>२. श्री. सतीश गोसावी<br>३. रतीलाल निकम<br>४. श्री. वैभव काळखैर<br>५. श्री. ढवळे, कोषा. कार्या., पुणे<br>६. श्री. प्रविण भालेराव, औरंगाबाद<br>७. श्री. प्रशांत जोशी, पुणे<br>८. श्री. काळपांडे, अमरावती<br>९. श्रीमती वंदना आवटे<br>१०. श्री. विनोद वेरुळकर, यवतमाळ<br>११. श्री. पंडीत घाडगे<br>१२. श्री. के. डी. पानसरे, पुणे<br>१३. श्री. घनश्याम महाजन<br>१४. श्री.खलील पटेल<br>१५. श्री.नरेंद्र पाटील |
| ५ | निवास व्यवस्था समिती | अध्यक्ष व सदस्यांची नांवे नाशिक येथील आयोजन समितीने निश्चित करावीत. | |
| ६ | भोजन व्यवस्था समिती | अध्यक्ष व सदस्यांची नांवे नाशिक येथील आयोजन समितीने निश्चित करावीत. | |
| ७ | क्रीडा समिती<br>मैदान, हॉल, क्रीडा साहित्य, सामन्यांची व्यवस्था, इत्यादी. | अध्यक्ष व सदस्यांची नांवे नाशिक येथील आयोजन समितीने निश्चित करावीत. | |
| ८ | सांस्कृतिक कार्यक्रम समिती | श्री. सु. गो. व्यास,<br>उपसंचालक,संचालनालय,मुंबई. | १. श्री.अरुण साळुखे<br>२. श्री.कुसुम राठोड<br>३. श्री.गणेश पुरभे<br>४. श्री.विलास पांडे<br>५. श्री.प्रमोद रंगारी<br>६. श्री. घारपुरे<br>७. श्री.पुरंदरे<br>८. श्री.निलाधर पाटकर<br>९. श्रीमती मंगला येवले<br>१०. श्रीमती सुजाता भिडे<br>११. श्री.शितल सावंत<br>१२. श्री.प्रमोद सोनटक्के<br>१३. श्रीमती शुभमा म्हात्रे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १४. श्री.जवळगेकर<br>१५. श्री.बाळा जाधव<br>१६. श्रीमती ऋता केळकर<br>१७. श्री.रघुनाथ गायकवाड<br>१८. श्री.विवेक राणे |
| ९ | तात्रिंक व निकालपत्र समिती | अध्यक्ष व सदस्यांची नांवे नाशिक येथील आयोजन समितीने निश्चित करावीत. | |
| १० | वैद्यकिय समिती | अध्यक्ष व सदस्यांची नांवे नाशिक येथील आयोजन समितीने निश्चित करावीत. | |
| ११ | वाहतुक व्यवस्था समिती | अध्यक्ष व सदस्यांची नांवे नाशिक येथील आयोजन समितीने निश्चित करावीत. | |
| १२ | महिला खेळाडु व दक्षता समिती | श्रीम. सध्या पवार | १. श्रीमती पदमश्री तळदेकर<br>२. श्रीमती वसुधंरा गायकवाड<br>३. श्रीमती टोपले<br>४. श्रीमती विनीता भुमकर<br>५. श्रीमती लता मेहता<br>६. श्रीमती चैताली जाधव<br>७. श्रीमती शितल सावंत<br>८. श्रीमती राजश्री ठोकळ<br>९. श्रीमती नलीनी पाटकर<br>१०. श्रीमती सुनीता सुर्यवंशी<br>११. श्रीमती विद्या पवार<br>१२. श्रीमती कुसुम राठोड<br>१३. श्रीमती आस्मिता बाजी<br>१४. श्रीमती पुष्पा बाघ<br>१५. श्रीमती राजेश्वरी देशपांडे<br>१६. श्रीमती सिंदकर |

९) संचालनालय लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण समितीची आर्थिक बाजू बळकट करण्यासाठी सन २०१०-२०११ मध्ये रुपये २००/- या वार्षिक वर्गणी व्यतिरिक्त पुढील प्रमाणे ऐच्छिक देणगी सभासदांकडून घेण्यात यावी असेही एकमताने ठरले.

| अ.क्र. | गट | देणगी रुपये |
|---|---|---|
| १. | गट -अ | ६००/- |
| २. | गट-ब | ४००/- |
| ३. | गट-ब (अराप) | ३००/- |
| ४. | गट-क | २००/- |
| ५. | गट-ड | १००/- |

उपरोक्त प्रमाणे वर्गणी व देणगी डिसेंबर २०१० अखेर पर्यंत वसूल करुन ती राज्यस्तरीय समितीकडे पाठविण्यात यावी असा ठराव एकमताने पारीत करण्यात आला.

१०) सालाबाद प्रमाणे स्मरणीकेची छपाई व वाटप केंद्रीय समिती,मुंबई येथून न करता स्मरणीकेची छपाई व वाटप विभाग स्तरावर करण्याचे ठरले. जेणेकरुन विभागातील वर्गणीदारांना त्यांच्या जाहिरातीनुसार अंक वेळेत संबंधितांना पोहचविणे सुलभ होईल. तथापि या स्मरणीकेमध्ये छापावयाचे लेख, कविता, कथा, छायाचित्रे, मान्यवरांचे संदेश , मुखपृष्ठ इत्यादी साहित्य केंद्रीय समितीकडे पाठवावे. तद्नंतर ते विभागांकडे पाठविण्यात येतील. जाहिरातींचा समावेश त्या त्या विभागाने विभागीय स्मरणीकेत करावा. स्मरणीकेचे लेख, कविता,कथा,छायाचित्रे इत्यादी साहित्य दिनांक ३१/०१/२०११ पर्यंत केंद्रीय समिती,मुंबई येथे पाठवावे असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

११) क्रीडा स्पर्धा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी निधी उभारणे आवश्यक असल्यामुळे क्रीडा स्पर्धांचे निमित्ताने एक स्मरणीका प्रकाशीत करावी. व त्याच्या जाहिरातीचे दर पुढील प्रमाणे असावेत असे ठरले.

| अ.क्र. | जाहिरातीचा प्रकार | जाहिरातीचा दर |
|---|---|---|
| १. | मुखपृष्ठ | रुपये २५,०००/- |
| २. | मलपृष्ठ व मुखपृष्ठाचे आतील पान | रुपये २०,०००/- |
| ३. | पूर्ण पान रंगीत | रुपये १०,०००/- |
| ४. | पूर्ण पान साधे | रुपये ५,०००/- |
| ५. | अर्ध पान साधे | रुपये ३,०००/- |
| ६. | शुभेच्छा | रुपये ५००/- |

१२) राज्य, विभाग व जिल्हा स्तरावर जमा झालेली वर्गणी व देणगीची संपूर्ण रक्कम कल्याण समितीच्या मध्यवर्ती कार्यकारिणीकडे पाठवावी. तर इतर जमा रकमेपैकी ४५ टक्के रक्कम मध्यवर्ती कार्यकारीणीकडे, ४५ टक्के रक्कम विभाग कार्यकारीणीकडे व १० टक्के जिल्हा स्तरावर ठेवण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

१३) राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या वेळी करावयाचा सांस्कृतिक कार्यक्रम दोन दिवसा ऐवजी एक दिवस ठेवण्यात यावा. तसेच या कार्यक्रमात प्रत्येक विभागातून पहिल्या आलेल्या स्पर्धकास / संघास सहभागी करावे असा निर्णय घेण्यात आला.

नाशिक येथील स्पर्धांच्या वेळी पुढील सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात यावे असे ठरले.

| अ.क्र. | सांस्कृतिक कार्यक्रमाचा तपशिल | स्पर्धक | |
|---|---|---|---|
| १) | गाणे एकल ३ मिनिटे | पुरुष | महिला |
| २) | समुह नृत्य ७ मिनिटे | मिश्र | |
| ३) | स्टॅण्ड अप कॉमेडी (वेळ मर्यादा तीन मिनीटे) | मिश्र | |

१४) क्रीडा स्पर्धा दोन दिवसात आयोजित करण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय स्पर्धेत पुढील खेळ घेण्यात येतील असे सर्वानुमते ठरले.

| अ.क्र. | खेळाचा प्रकार | खेळाची पध्दत | स्पर्धक | |
|---|---|---|---|---|
| १) | व्हॉलीबॉल | शुटींग | पुरुष | |
| २) | क्रिकेट | टेनीस बॉल मर्यादित षटके १२ | पुरुष | |
| ३) | थ्रोबॉल | | महिला | |
| | **वैयक्तिक खेळ** | | | |
| ४) | धावणे | १०० मीटर | पुरुष | महिला |
| ५) | धावणे | २०० मीटर | पुरुष | महिला |
| ६) | लांबउडी | | पुरुष | महिला |
| ७) | गोळाफेक | | पुरुष | महिला |
| ८) | थाळीफेक | | पुरुष | महिला |
| ९) | कॅरम एकेरी | | पुरुष | महिला |
| १०) | कॅरम दुहेरी | बेस्ट ऑफ थ्री | पुरुष | महिला |
| ११) | बुध्दीबळ | खुली स्पर्धा | मिश्र | |
| १२) | टेबल टेनीस एकेरी | | पुरुष | महिला |
| १३) | टेबल टेनीस दुहेरी | | पुरुष | महिला |
| १४) | बँडमिंटन एकेरी | | पुरुष | महिला |
| १५) | बँडमिंटन दुहेरी | | पुरुष | महिला |
| १६) | चालणे ४५ वर्षावरील | ५ किलोमिटर | पुरुष | महिला |

सांघिक क्रीडा प्रकार व वैयक्तिक क्रीडा प्रकारात वेगळे खेळाडू असावेत. म्हणजे वेळापत्रक पाळले जाऊ शकेल. असाही सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

१५) यापूर्वी सांघीक खेळासाठी तयार करण्यात आलेल्या सर्व फिरत्या ट्रॉफीज सहसंचालक लेखा व कोषागारे,नाशिक विभाग,नाशिक यांचेकडे पाठविण्यात याव्यात असे ठरले.

१६) प्रत्येक विभागाने स्पर्धेसाठी पथक पाठवितांना पथक प्रमुखाची नेमणूक करावी. व प्रमुखाने आपले प्रतिनिधी शिस्त पाळतील याची दक्षता घ्यावी. क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये शिस्त राहण्यासाठी शिस्तीचे पालन न करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना प्रथम वेळी रुपये ५००/- व दुसऱ्या वेळी रुपये १०००/- एवढा आर्थिक दंड गतवर्षी ठरल्यानुसार आकारण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. त्याच प्रमाणे अशा अधिकारी / कर्मचाऱ्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी येणाऱ्या सर्व प्रतिनिधींनी स्पर्धांच्या समारोप कार्यक्रमापर्यंत उपस्थित राहणे आवश्यक राहील असे स्पष्ट करण्यात आले.

प्रत्यक्ष स्पर्धेत भाग घेणारे स्पर्धक व संघ व्यवस्थापक यांच्याच जाण्यायेण्याचा खर्च समितीतर्फे करण्यात यावा असेही सर्वानुमते ठरले.

१७) विद्यमान अध्यक्ष श्री शिलानाथ जाधव यांनी सर्वसाधारण सभेपुढे खालील दोन प्रस्ताव मांडले.

(अ) DATSWA च्या केंद्रिय समितीच्या घटनेमध्ये कार्यकारी अध्यक्ष नेमणूक करण्याची तरतूद आहे या तरतुदीनूसार सन २०१०-११ ते २०१२-१३ या कार्यकारीणीच्या कालावधीसाठी कार्यकारी अध्यक्ष म्हणून श्री. रवींद्र धोंगडे, संचालक संवर्ग यांचे नाव विद्यमान अध्यक्षांनी सूचविले.

व

(ब) ले. व को. व स्था. नि. ले. वि. साठी सेवाप्रवेश परीक्षा व लेखा लिपिक परीक्षा व म. वि. ले. से. परीक्षा, कर्मचा-यांना द्याव्या लागतात. परिक्षा असली म्हणजे ताण येतो. तसेच परीक्षेसाठी लागणारी पुस्तके व साहित्य/ सामग्री जमा करणे अवघड तसेच खर्चिकही होते. यावर मार्ग काढण्यासाठी माहितगार व तज्ञ अधिकारी / कर्मचा-यांकडून परीक्षा विषयक साहित्य / सामग्री प्राप्त करुन संगणक / नविन तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे 'यशदा' पुणे यांच्या सहाय्याने सी. डी. (C. D.) तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला.

विद्यमान अध्यक्षानी मांडलेल्या वरील प्रस्तावास श्री. सुनिल व्यास,उपसंचालक यानी अनुमोदन देऊन सदर प्रस्ताव अभिनंदनीय स्तुत्य असल्याचे सांगितले. उपस्थितांनी आवाजी मतदानाने या दोन्ही प्रस्तावाना एकमताने संमती दिली.
खेळांसाठी शासनाच्या क्रीडा विभागाने निश्चित केलले नियम हे आधारभूत असावेत असे सर्वानुमते ठरविण्यात आले एखाद्या अधिकारी/ कर्मचा-यांस, उत्कृष्ट खेळाडूला/संघाला वैयक्तिकरित्या बक्षिस द्यावयाचे असल्यास अशा अधिकारी / कर्मचा-याने सदरची बाब आयोजकांकडे आगाऊ कळविणे बंधनकारक राहील कोणालाही प्रत्यक्ष स्पर्धेच्या वेळी अशी बक्षिसे अचानक जाहीर करता येणार नाहीत असे एकमताने ठरले.

१८) नाशिक विभागातील सहसंचालक, लेखा व कोषागारे आणि सहमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांनी एकत्रित बैठक घेवून नाशिक विभागात घ्यावयाच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांकरीता स्थानिक समित्यांची नियुक्ती करावी असे ठरले तसेच स्टेडीयम/मैदानाची उपलब्धता व येणाऱ्या प्रतिनिधींची राहण्याची व्यवस्था या बाबत एकमेकांशी विचार विनीमय करुन स्पर्धांच्या तारखा निश्चित करण्यात याव्यात असे ठरविण्यात आले. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा काटकसरीने आयोजित करण्यात याव्यात व हिशोबाचे काम चोख ठेवण्यात यावे. तसेच देणगीसाठी लोकांवर सक्ती करु नये अशा सूचना सभेत देण्यात आल्या.

श्री.परदेशी यांनी उपस्थितांचे आभार मानले. त्या नंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे जाहिर करण्यात आले.

(शिलानाथ जाधव)
अध्यक्ष,
संचालनालय लेखा व कोषागारे कर्मचारी कल्याण समिती,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.